महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६ वे | दिनांक : ०४/०१/२०२६ | वार : रविवार


## 'बिनविरोध पॅटर्न' विरोधात मनसे कोर्टात जाणार



**मुंबई** : राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असले तरी, अनेक प्रभागांमध्ये आतापासूनच विजयाचा उत्सव सुरू झाला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातील ७० जागी विरोधी उमेदवारांची माघार किंवा एकच उमेदवार रिंगणात उरल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. यामध्ये महायुतीचे, विशेषतः भाजपचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. या विचित्र राजकीय परिस्थितीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आश्चर्य व्यक्त करत, "उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही," असे विधान केले आहे.

ठाण्याचे शहराध्यक्ष अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, राज ठाकरेंनी महानगरपालिकेतील बिनविरोध विजयावरुन वक्तव्य केले. माझ्या उभ्या आयुष्यात अशी निवडणूक कधी मी पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण अशी निवडणूक जी इतक्या उमेदवारांना बिनविरोध करते. ही परिस्थिती पहिल्यांदाच मी पाहतोय, असे राज ठाकरे म्हणाले.

दरम्यान, या 'बिनविरोध पॅटर्न'विरोधात मनसे सोमवारी न्यायालयात धाव घेणार आहे. "उमेदवार कोट्यवधी रुपयांना विकत घेतले असून कोपरीतील आमच्या महिला उमेदवाराला 5 कोटींची ऑफर देण्यात आली," असा खळबळजनक आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी पुराव्यांसह केला आहे. राज ठाकरेंची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

“कोपरी भागातील मनसेच्या महिला उमेदवाराला पमनानी नावाच्या व्यक्तीने मध्यरात्री जवळपास 30 ते 40 वेळा फोन केले. त्यांना मुलुंड येथे जबरदस्ती भेटायला बोलावलं होतं. उमेदवारी मागे घेण्याकरता त्यांना पाच कोटीची ऑफरही देऊ केले. हवं तर तिथलं सीसीटीव्ही फुटेज चेक करा”, असंही अविनाश जाधव म्हणाले.

“राज्यात बिनविरोध पॅटर्न तयार झाला आहे. हा पॅटर्न आता मोडला नाही तर निवडणुकीच्या सहा महिने आधी माणसं दुसऱ्या पक्षात पाठवतील आणि निवडणुकाच होऊ देणार नाहीत. याची चौकशी झाली तर 64 च्या 64 ठिकाणी पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतील. निवडणुकीचा अधिकार प्रत्येकाला आहे. निवडणुकाच होणार नसतील तर मतदान करण्याचा अधिकार मिळणार नाही”, असेही अविनाश जाधव म्हणाले.

बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांमध्ये भारतीय जनता पक्षाने मोठी आघाडी घेतली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही जोरदार मुसंडी मारली आहे. आतापर्यंत भाजपचे ४४ नगरसेवक बिनविरोधी निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे गटाच्या २२ उमेदवारांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. तर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे २, इस्लाम पार्टीचा १ (मालेगाव) आणि अपक्ष १ असे एकूण ७० नगरसेवक महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडून आले आहेत.

राज्यात सर्वाधिक बिनविरोध निवडणुका कल्याण-डोंबिवली महापालिकेत झाल्याचे समोर आले आहे. येथे महायुतीचा प्रचंड प्रभाव पाहायला मिळत असून, भाजपचे १५ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. तर शिवसेना शिंदे गटाचे ७ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

दरम्यान, बिनविरोध निवडींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ६० ते ६५ उमेदवार बिनविरोध कसे काय निवडून येतात? हे कोणत्या विकासकामांच्या, कोणत्या लोकहिताच्या कर्तृत्वावर? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी भाजपच्या सत्ताकाळातील कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं. बिनविरोध निवडी ही लोकशाहीची हत्या असून, मतदारांचा हक्क हिरावून घेतला जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

निवडणूक आयोगावरही राऊतांनी सडकून टीका केली. निवडणूक आयोग म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांच्या ताटाखालचं मांजर झालं आहे, अशा तीव्र शब्दांत त्यांनी आयोगाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. बिनविरोध निवडींची सखोल चौकशी झाली पाहिजे, अन्यथा लोकशाहीवरील विश्वास उडेल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, या बिनविरोध निवडी लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवणाऱ्या आहेत का, याचा तपास करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले असून चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बिनविरोध विजयी उमेदवाराची अधिकृत घोषणा केली जाणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

बिनविरोध निवडीमागे विरोधी उमेदवारांवर दबाव, आमिष किंवा जबरदस्ती करून नामनिर्देशन मागे घ्यायला लावले गेले का, याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. विशेषतः मुंबईसह राज्यातील काही संवेदनशील प्रभागांमध्ये अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक अधिकाऱ्यांना सतर्कतेचे आदेश दिले असून नियमभंग आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र उमेदवारांना पुन्हा नामनिर्देशन दाखल करण्याची कोणतीही तरतूद नसल्याने या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## गुन्हेगाराने मर्डर केला, तर त्याचे खानदान दोषी नसते - अजित पवार



**पुणे** : महापालिका निवडणुकीसाठी कुख्यात गुंडांच्या घरातील सदस्यांना 'घड्याळ' चिन्हावर उमेदवारी मिळाल्यामुळे विरोधकांनी अजित पवारांना लक्ष्य केले होते. यावर आज अजित पवार यांनी प्रतिक्रिया देत, गुन्हेगाराने मर्डर केला तर त्याचं खानदान दोषी नसते, असे म्हणत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. अजित पवार आणि आरपीआयचे नेते सचिन खरात यांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. यावेळी पत्राकरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अजित पवारांनी रोखठोक भूमिका मांडली.

राष्ट्रवादी कॉंग्रेसने पुणे महापालिका निवडणुकीत कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनी पक्षाच्या एबी फॉर्मवर आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. गजा मारणे सध्या तुरुंगात आहे. तो आपल्या काळ्या कारवायांप्रकरणी कुख्यात आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी कुख्यात गुंड बापू नायर याच्या पत्नीलाही उमेदवारी दिली आहे. याशिवाय कुख्यात गुंड बंडू आंदेकर याची भावजय लक्ष्मी आंदेकर व सून सोनाली आंदेकर यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने ह्या उमेदवारी दिल्यामुळे अजित पवारांवर टीकेची झोड उठली आहे.

अजित पवार यांनी स्पष्ट केले की, संबंधित जागा ही आरपीआयचे सचिन खरात यांच्यासाठी सोडण्यात आली होती. चिन खरात आणि सीताराम गंगावणे यांनी सांगितले की, त्यांचे अधिकृत चिन्ह पोहोचायला वेळ लागेल, त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीच्या 'घड्याळ' चिन्हाची मागणी केली. मी माझ्या मित्रपक्षाला जागा दिली आहे. तिथे कोणाला उमेदवारी द्यायची हा सर्वस्वी त्यांचा अधिकार आहे. मी माझ्या पक्षाचा अधिकृत उमेदवार तिथे दिलेला नाही.

गुन्हेगारांच्या नातेवाईकांना उमेदवारी देण्यावरून होणाऱ्या टीकेवर अजित पवार यांनी अत्यंत रोखठोकपणे आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, "जर एखाद्याने हत्या केली, तर त्याचे संपूर्ण कुटुंब त्याला जबाबदार आहे असे म्हणणे चुकीचे आहे. उद्या मी काही गुन्हा केला तर त्याच माझ्या पत्नीचा काय दोष आहे? माझा मुलांचा, मुलींचा किंवा सूनांचा काय दोष आहे? असं नाहीय. जर एखाद्याने हत्या केली तर त्याचं संपूर्ण खानदान त्याला जबाबदार आहे, असे म्हणण्याचे कारण नाही. ती विकृती असते. काही चुकीच्या गोष्टी असतात?" असे सांगत त्यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

यावेळी बोलताना अजित पवार यांनी भाजपवर पुन्हा एकदा जोरदार हल्ला चढवला. "भाजपच्या कारभाराला पुणेकर वैतागले आहेत. भाजपच्या कारभारावर पुणेकर राग, चीड व्यक्त करतील. पुण्याचे कारभारी बदला. त्रिकुटाकडे असलेली सत्ता माझ्याकडे द्या. राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता आहे. पण पुण्याच्या कारभाऱ्यांकडे इच्छाशक्तीचा अभाव, पाठपुराव्याची क्षमता नाही", अशी टीका अजित पवारांनी केली. "एकहाती सत्ता द्या, आमची प्रशासनावर पकड आहे. पुण्याचा पिंपरी चिंचवडप्रमाणे विकास करू," असे अजित पवार म्हणालेत.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत आता 'गुन्हेगारीकरण' आणि 'विकास' या दोन मुद्द्यांवरून रणधुमाळी अधिक रंगणार असल्याचे दिसून येत आहेत. अजित पवारांनी चेंडू आरपीआयकडे ढकलला असला तरी, 'घड्याळ' चिन्हामुळे विरोधक त्यांना घेरण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत.

## राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त



**मुंबई** : महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला 37.5 वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीनंतर आज सेवानिवृत्त झाल्या. मुंबईतील नायगाव पोलिस मैदानावर आयोजित एका सोहळ्यात त्यांना निवृत्तीनिमित्त 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना देण्यात आली. 1988 च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या शुक्ला यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखल्याचे समाधान व्यक्त केले. रश्मी शुक्ला यांच्या निवृत्तीनंतर राज्याच्या पोलिस महासंचालकपदाची धुरा आता सदानंद दाते यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना रश्मी शुक्ला सर्वांचे आभार मानले. "गेली दोन वर्षे महाराष्ट्र पोलिसांचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. या काळात राज्यातील सण-उत्सव शांततेत पार पडले आणि निवडणुकाही विनाअडथळा पार पडल्या. विशेषतः गडचिरोली आणि गोंदियातील नक्षलग्रस्त भागांत झालेली सुधारणा आणि नक्षलवाद्यांच्या संख्येत झालेली घट, हे संपूर्ण पोलिस दलाचे यश आहे," असे त्या म्हणाल्या.

रश्मी शुक्ला यांची कारकीर्द काही वादांनीही गाजली. महाविकास आघाडीच्या काळात त्यांच्यावर फोन टॅपिंगचे आरोप करत गुन्हा दाखल करण्यात आला होता. राज्यातील सत्तापालटानंतर त्यांच्यावरील गुन्हे रद्द करण्यात आले. तसेच विधानसभा निवडणुकीदरम्यान विरोधीपक्षांनी रश्मी शुक्ला यांच्यावर पक्षपाताचे आरोप केल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांची बदलीही केली होती. पण नंतर महायुतीचे सरकार आल्यावर त्यांची राज्याच्या पोलिस महासंचालकपदी वर्णी लावण्यात आली.

सेवानिवृत्तीनंतर रश्मी शुक्ला यांनी मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान 'वर्षा' येथे जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक करताना म्हटले की, "राज्याची कायदा-सुव्यवस्था राखण्यात रश्मी शुक्ला यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. प्रशासकीय सेवेतील त्यांचा प्रदीर्घ अनुभव राज्यासाठी मोलाचा ठरला."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


# कन्नड व्हावे कवितेचे गाव आणि एक वाङ्मयीन पर्यटन स्थळ




कन्नड तालुक्याला फार मोठी समृद्ध अशी ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमी आहे. पितळखोरा ऐतिहासिक लेणी, अजिंठा डोंगर रांगा, निसर्ग रम्य गौताळा अभयारण्य, शेकमारू बाबा, भैरवनाथाचे पुरातन मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरां ची झालेली ऐतिहासिक मक्रणपूर परिषद व जयभीम ची घोषणा. कालीमठ, जवळच असलेले पाटणादेवी मंदिर, पिशोरचे पुरातन सिध्देश्वर मंदिर, सूवर्ण पालेश्वर सर्वात उंच डोंगर, चक्रधर स्वामिंच्या पदस्पर्शाने पावन हा परिसर शिवरायांची शिवराई. अशी कितीतरी प्राचीन व पुरातन मंदिरे व तिर्थक्षेत्रे या तालुक्यात आहेत. वाकी येथील शिवेश्वर संस्थान, तेलवाडी येथील डोंगरावर बंजारा समाजाचे भव्य मंदिर, मेहेगाव येथील वारकरी चळवळीचे केंद्र भगवानगड, बहिरगाव येथील शिवपुरी महारांचा मठ, देवपळ येथील नवसाला पावणारा गणपती, मेहेगावातील पुरातन शनी मंदिर तसेच तालुक्यात चिकलठाण, रेल नावडी, पिशोर, औराळी, हतनूर, चिंचोली, परिसरात आजही नाटयचळवळ सुरू आहे. कलगीतुऱ्याची गाणी म्हणणारे , जागरण गोंधळ करणारे मंडनचं लग्न फेम परसराम घुसाळे, शिवराई येथील शिनगारे, तसेच वारकरी भजनी मंडळ, चिलिया बाळ गायक, इंडियन आयडॉल फेम प्रा. राहुल खरे. नव्या पिढीतील कीर्तनकार नरहरी महाराज,डॉ. राधाकृष्ण अकोलकर, ज्ञानेश्वर भवर, रामेश्वर महाराज मगर, मेहेगाव येथील गडावरील पुरुषोत्तम महाराज जायभाये, भागवत महाराज आव्हाळे, या कीर्तन कारांनी तालुक्याचा नावलौकिक वाढविला आहे. साहित्याच्या व सांस्कृतिक क्षेत्रात सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालया तर्फे विविध उपक्रम सुरू आहेत. कन्नड तालुका महोत्सव हा मा. मानसिंहजी पवार साहेब यांच्या प्रेरणेने व नेतृत्वाखाली संपन्न झाला. त्यामुळे वैचारिक, सांस्कृतिक भरण पोषण झाले. शिवाजी महाविद्यालयात सातत्याने विविध वाङ्मयीन सामाजिक उपक्रम सुरू आहेत. अन्य संस्थाही चांगले उपक्रम घेत आहेत. व्याख्याने, कविसंमेलने होऊ लागली आहेत. लेखक , कवी, व्याख्याते तयार होत आहेत. जागतिक पातळीचे चित्रकार राजानंद सुरडकर, चित्रकार पाचपोळ सर, चित्रकार प्राणजित बोरसे, विजय बोरसे, महादू गावीत, ईम्रान शेख चित्रकारितेच्या क्षेत्रात दखलपात्र योगदान देत आहे. आदिवासी ठाकर, भिल्ल, बंजारा जमाती आपले सांस्कृतिक जीवन आजही समृद्धपणे जगत आहेत, कन्नडची सिद्धीकशहा बाबांचा ऊरूस, पिशोरची हिराजी महाराज यात्रा, औराळा येथील लक्ष्मी आईची यात्रा आदी यात्रा व उरूस कन्नड तालुक्याची सांस्कृतिक जडणघडण व मनोरंजन करीत आहेत. गावोगावी अखंड हरिनाम सप्ताह, फिरते नारळी सप्ताह यामुळे लोकमन घडविण्याचे व समाज प्रबोधनाचे मोठे काम होत आहे. राजकीय क्षेत्रात महाराष्ट्राला सुपरिचित असलेले लोकनेते सहकार महर्षी बाळसाहेब पवार, रामराव अण्णा बहिरगावकर ,मा.आ. बाबुरावजी औराळकर, मा.आ. नारायणराव पा. नागदकर, लक्ष्मणराव मोहिते अण्णा,मा.आ. टी. एस. पाटील, मा.आ. रायभान जाधव, तेजस्विनी ताई जाधव, आदीं लोकनेत्यांनी तालुक्याच्या व महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक क्षेत्राला नवी दिशा दिली आहे. तालुक्यात अनेक सिंचन प्रकल्प आहेत. पूर्णा नेवपूर, गडदगड, अंजना पळशी, शिवना टाकळी, अप्पासाहेब नागदकर अंबाडी प्रकल्प, यांनी तालुक्याचे रान हिरवे केले आहे. ऐतिहासिक औट्रम घाट, पिशोर घाट, नागद घाट असे छोटे मोठे घाट लक्षवेधून घेतात. कन्नडचे सांस्कृतिक चळवळीचे व उपक्रमाचे केंद्र म्हणून सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय , महत्वाचे योगदान देत आहे. फिल्म फेस्टिवल, व्याख्यानमाला, संगीत महोत्सव ही या वाचनालयाची देण आहे. कन्नडची नवी ओळख आता होऊ लागली. साहित्याच्या क्षेत्रात जुन्या काळापासून आजतागायत अनेक लेखक, कवी, पत्रकार, महत्वाचे योगदान देत आहेत. कमयोगी रामराव अण्णा बहिरगावकर यांनी बहिरगाव येथे ऐंशीच्या दशकात ग्रामीण साहित्य संमेलन घेवून तालुक्याच्या साहित्य क्षेत्राला नवी दिशा दिली. डॉ. टी. एस. पाटील, डॉ.डी. डी . शिंदे, तेजस्विनी ताई जाधव, डॉ. रमेश सूर्यवंशी, डॉ. अंबादास सगट, डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ. सरला गोरे, डॉ. अनिता खंडागळे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. संजय गायकवाड, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. संजय भालेराव, डॉ.जे.व्ही. भेलोंडे आदींनी लेखनाच्या क्षेत्रात तालुक्याला नाव लौकिक प्राप्त करून दिला. अनेकांचा उल्लेख करता येईल. हा काहीसा ओझरता आढावा. पिंपळपान चे अशोक पवार, शिवनातीर चे मधु महाले यांनीही तसेच नव्या पिढीत डॉ. शिवाजी हुसे यांनी तिफण हे त्रैमासिक सुरू करून तालुक्यात साहित्यिक चळवळ गतिमान केली. तिफण पंधरा वर्षापासून वाङ्मयाच्या क्षेत्रात विविध उपक्रमाच्या माध्यमातून महत्वाचे योगदान देत आहे. गेल्या सात वर्षा पासून तिफण कविता महोत्सवाने कन्नडची साहित्य भूमी आपल्या अक्षरपेरणीने सुपीक बनवली आहे. छोटे मोठे उपक्रम होत आहे. त्यातून अनेक नवकवी, लेखक उदयास येवून लेखन करीत आहेत. अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, प्रविण दाभाडे, संदीप वाकडे, राजेंद्र भोसले, प्रकाश काळे, अजय दवंडे, प्रभत शेळके, भरत सोनवणे, भीमराव सोनवणे, सुरेश औटे, काका थोरात, शिवनाथ गायकवाड, ब्रम्हगिरी गोसावी, प्रकाश शहरवाले, नाना लहाने, विवेकानंद सुकाळे, भगवान ठाकरे, अनिता राठोड, शुभदा देवरे, अर्चना धाटबळे, वृषाली सोनवणे, रमेश वाघचौरे, सूर्यकांत सांभाळकर, गीतांजली गजबे असे कितीतरी नव्या पिढीतील कवी दमदारपणे लेखन करीत आहेत. रुतुजा मगर आव्हाळे, या मुलीही काव्याच्या क्षेत्रात धडपड करीत आहेत. साहित्य संस्था तसेच अनेक महत्वाच्या पदावर तालुक्यातील प्राध्यापक , कवी काम पहात आहेत. एकुणच काय तर कन्नड तालुक्यात गावागावात कवी तयार झाले. आगामी काळात कन्नड हे कवितेचे गाव म्हणून आणि वाङ्मयीन पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास यावे हा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी सर्वांचे पाठबळ , सहकार्य व मार्गदर्शन आवश्यक आहे. तिफण कविता महोत्सव हा त्याचाच एक भाग आहे. या ऐतिहासिक वाङ्मयीन उपक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी अवश्य यावे.

**डॉ. शिवाजी हुसे**
**संयोजक : तिफण कविता महोत्सव**

# हार्मोनल बदल समजून घेतले तर आरोग्य समस्या टाळता येतात : डॉ. अपर्णा जगताप




**उमरगा :** किशोर वयीन मुलीनी शरीरात होणारे हार्मोनल बदल समजून घेऊन जीवनशैलीत बदल केल्यास बऱ्याच आरोग्य समस्या टाळता येऊ शकतात असे प्रतिपादन डॉ. अपर्णा जगताप यांनी केले. त्या ०३ जानेवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे महिला सक्षमीकरण कक्षाच्या वतीने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. वसुंधरा निचत यांनी करून दिला. महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण कक्षाच्या वतीने आयोजीत या कार्यक्रमात पुढे बोलताना डॉ. जगताप म्हणाल्या की, हार्मोनल बदल समजून घेतले तर आरोग्य समस्या टाळता येतात. त्यांनी किशोरवयीन अवस्थेत होणारे हार्मोनल बदल, प्युबर्टी, मासिक पाळी, गर्भधारणा व मेनोपॉज यामुळे शरीरावर होणारे परिणाम सोप्या भाषेत स्पष्ट केले. तसेच योग्य आहार, पोषणमूल्यांचे महत्त्व, पोषणाची कमतरता असल्यास उद्भवणाऱ्या आजारांविषयी सखोल माहिती देत विद्यार्थिनींना आरोग्यदृष्ट्या जागरूक राहण्याचा संदेश दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित विद्यार्थिनींमध्ये मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिसून आला.याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणातील योगदानाचा गौरव करत आजच्या विद्यार्थिनींनी शिक्षणासोबत आरोग्याविषयीही सजग राहण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. रेशमा नितनवरे केले. याप्रसंगी डॉ. मनोरंजना निर्मळे, डॉ. पार्वती सावंत, प्रा. डॉ. आशा शिंदे, डॉ. प्रतिभा गायकवाड, डॉ. रंजना चोचंडे, प्रा. बिना लोकरे, प्रा. वसुंधरा निचत, प्रा. ज्योती जोळदाबके, प्रा. प्रणिता मोरे, प्रा. ज्योती जेवले, प्रा. आरती जाधव, प्रा. सपना राठोड, प्रा. मयुरी माडजे, प्रा. श्रद्धा पाटील, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. संध्या चौगुले, प्रा. राधिका चव्हाण, प्रा. तनुजा चिंचोले यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बिना लोकरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## कालिकादेवी विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**शिरूर कासार :** दि.०३ जानेवारी २०२६ शनिवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे यांच्या हस्ते, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे, प्रा.महारूद्र डोंगरे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे,प्रा.नारायण घोलप, प्रा. अशोक इनकर, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा. संजय आव्हाड, प्रा. अनिल जरे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा. बिभिषण घायाळ, प्रा. महादेव हांगे,प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा. सुनिल मोरे, प्रा. दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा. शशिकांत जावळे,डॉ.अशोक घोडके, प्रा.अशोक सवासे, प्रा.विनोद गलांडे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा. बाळासाहेब खटाणे, प्रा. अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले, प्रा. सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ, सौ. अनिता लाटे,रविंद्र बडे, बाळासाहेब येवले,वसंत आहेर, जयेंद्र निकम,राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, प्रशांत राऊत, नितीन बहिर,रोहित शिराळे, आदिनाथ काशिद,
सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले आणि विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,'सावित्रीबाई फुले' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.






## पीएमश्री प्राथमिक शाळा केसरजवळगा येथे बालिका दिन उत्साहात



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** पीएमश्री जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा केसरजवळगा येथे ३ जानेवारी रोजी बालिका दिन क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या महिला सरपंच मा. श्रीमती पूजा पटवारी होत्या.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीदेवी पाटील, महादेव महाराज, लक्ष्मी राजपूत, मायदेवी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बालिकांनी सुरेल गायन, आकर्षक नृत्य सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. तसेच मुलींनी आपल्या मनोगतांतून शिक्षणाचे महत्त्व, आत्मविश्वास व स्त्री-सक्षमीकरण यावर प्रभावी विचार मांडले.कार्यक्रमाची प्रस्तावना साधना ताशी यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मा. बालाजी भोसले यांच्यासह सहशिक्षक सुनील राठोड, संजीव भोसले, गणेश सुंकेवार, गजानन खमीतकर, अनंत वाघमोडे, महादेव कुन्हाळे आदींनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सानवी लोखंडे व कु. सोनाक्षी गायकवाड यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन कु. रिया गायकवाड यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम आनंदी व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## जिजामाता महाविद्यालय निपाणी येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन




**कन्नड (अरुण थोरात) :** जिजामाता कला विज्ञान महाविद्यालय निपाणी ता.कन्नड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ज्यांनी क्रांतीची ज्योत पेटवली आणि तेवत ठेवली, ज्यांच्या विचारधारेने महिलांना स्वावलंबी बनण्याचे धडे मिळाले. रूढी परंपरांना डावलून महिलाही सक्षम बनली अशा विद्यादायनी एक युगंधरा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंतीनिमित्त महाविद्यालया मध्ये त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून वैविध्य उपक्रम राबवण्यात आले. महिला दिन व बालिका दिन कशासाठी साजरा केल्या जातो. तसेच सावित्रीबाई फुले व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत शिक्षण घ्यावे. ग्रामीण भागातील पालकांनी ही विशेषतः आपल्या मुलींना उच्चतम असे शिक्षण देऊण स्वताच्या पायावर उभे करावे. एक महिला शिक्षीत झाली तर संपूर्ण कुंटूब ही शिक्षित करु शकते. यासाठी फुले दांपत्याचा आदर्श घ्यावा असे अवाहन याप्रसंगी प्राध्यापक आशिष अजमेरा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर केले. ज्ञानाची अखंड ज्योत तेवत राहावी या उदांत भावनेने यावेळेस महाविद्यालयातर्फे महिला शिक्षिका प्राध्यापिका श्रीमती पवार व्ही.व्ही यांच्या हस्ते विद्यार्थिनींना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी
महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. त्यात प्राचार्य गोंगे बी टी, प्रा.चव्हाण जी.ए, प्रा. मोरे बी आर, प्रा. सोमवंशी एस एस, प्रा. पवार वाय आर, प्रा. भवर एस जी, प्रा. काटे बी बी, प्रा. सोनवणे के एस, बोरसे ए व्ही, आटोळे ए आर आदींसह इतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## शिवाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न




**कन्नड :** येथील शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार राज्यस्तरीय अंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. ही स्पर्धा कन्नडचे भूमिपुत्र व महाराष्ट्रातील नामवंत नेते माननीय बाळासाहेब पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी घेण्यात येते. स्पर्धेचे हे दहावे वर्ष आहे आतापर्यंत वेगवेगळ्या विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.यावर्षी 'आजचे सामाजिक वास्तव आणि युवक' असा विषय स्पर्धकांना देण्यात आला होता. या स्पर्धेचे उद्घाटन संत तुकाराम महाविद्यालय कन्नड येथील प्राचार्या डॉ.सुनिता शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना निकोप समाज निर्मिती साठी युवकांनी 'आजचे सामाजिक वास्तव आणि युवक' या विषयावर चिंतन मंथन करणे गरजेचे आहे.तसेच युवकांनी चिंतनशीलतेला कृतीशीलतेची जोड देणे सुद्धा महत्त्वाचे आहे असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी लोकनेते बाळासाहेब पवार यांनी मराठवाड्यासाठी केलेल्या महान कार्यांची आठवण केली व विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेत भविष्यात वाटचाल करावी असे आवाहन केले. याप्रसंगी मंचावर संस्थेचे संचालक मा.श्री लक्ष्मणराव देशमुख,मा.विशाल आहेर, उपप्राचार्य डॉ. बी.के मगर,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री अभय आहेर , मोठया संख्येने स्पर्धक, विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. उद्घाटकीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा शिवाजी हुसे यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण सुनील डोके, वर्षाली सोनवणे व उज्वला कोंडके यांनी केले.स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणाहून 25 संघांनी सहभाग नोंदवला.यामध्ये प्रामुख्याने मुंबई, पुणे, लातूर,नागपूर,अहिल्यानगर,चाळीसगाव संभाजीनगर आदी ठिकाणाहून विद्यार्थी सहभागी झाले.'आजचे सामाजिक वास्तव आणि युवक' या विषयावर विद्यार्थ्यांनी अत्यंत गंभीर व सखोल विचार व्यक्त केले.या स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत अण्णा देशमुख यांच्या हस्ते पार पडले. बक्षीस वितरण समारंभात मार्गदर्शन करताना वक्तृत्व स्पर्धेत ठेवलेला विषय अत्यंत समायोजित असून समाजातील अनेक त्रुटींना दूर करण्यासाठी युवकांनी विवेकी व विचारशील होत विधायक उपक्रम राबविले पाहिजेत असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.विजय भोसले यांनी केला.मंचावर निबंधक श्री पाटील सर,उपप्राचार्य डॉ बी के मगर सर यांची प्रमुख उपस्थिती होती .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ के.एल भानुसे तर आभार डॉ.रामचंद्र झाडे यांनी मानले.स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे प्रथम- यश रवींद्र पाटील डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई, द्वितीय- अभय कृष्णाकांत आळशी डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई,तृतीय- जान्हवी राजेंद्र गाडे शिवाजी महाविद्यालय कन्नड,उत्तेजनार्थ प्रथम- विशाल रमेश सोनवणे चन्नबसवेश्वर कॉलेज लातूर,उत्तेजनार्थ द्वितीय- अश्विनी शेषराव घुगे यू डी पात्रीकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट पाथरी

## सत्तेचा डाव आणि माणूस

हिंदू खतरेत नाही रे, भावांनो बहिणींनो,
खतरेत माणूस आहे रे, ओळखा रे सज्जनांनो ॥१॥

धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता एक झाली,
त्यांनी गळ्यात गळे घालुनी, सत्तेची सौदेबाजी केली ॥२॥

धर्माचा केला बाजार, राजकारणाचा आसरा,
भांडवलाच्या पायाशी वाकविला न्यायाचा कासरा ॥३॥

संविधान ठेवलं बाजूला, हक्कांवर घातला घाला,
सर्वसामान्य जनतेचा आवाज केला मुका-बोला ॥४॥

स्त्रीची अब्रू घोषणेत, प्रत्यक्षात मात्र जखमी,
शिक्षण—नोकरी—आरोग्य — सत्ता म्हणे "परवडत नाही" ॥५॥

जंगल लुटले, उद्योग विकले, डोंगर मोडून खाल्ले,
विकासाच्या नावाखाली माणूसपण गहाण ठेवले ॥६॥

हा अपघात नव्हे रे बंधूंभगिनींनों, हा रचलेला डाव आहे,
विषम सत्ताधाऱ्यांचे हे ठरवून केलेले षड्यंत्र आहे ॥७॥

धर्म नाही संकटात, संकटात विवेक आहे,
प्रश्न विचारणारा माणूसच त्यांना सर्वांत शत्रू आहे ॥८॥

मानवतेची मशाल धर रे हाती,
सत्ता नव्हे सत्य मोठे — हीच खरी शक्ती ॥९॥

जागा हो रे माणसा, फसवणुकीला ओळख,
माणूस वाचविलास तरच वाचेल लोकशाहीचा श्वास ॥१०

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड कॉलेज आसेगाव येथे सावित्रीच्या लेकींचा गौरव




**दौलताबाद (जावेद अहमद) :** प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा आम्ही सावित्रीच्या लेकी या कार्यक्रमात शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून शाळेच्या अधक्षा गीता फाळके, तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ .कांचन रेवडकर व डॉ. कल्याणी पाटील,उद्योजिका रंजना कांबळे, फतीयाबाद उपसरपंच छाया नाईक, खोजेवाडी उपसरपंच हिराताई परहाड ,योगिता सोनटक्के, स्वाती पपैया, EPTA अधक्ष नंदा गायकवाड, कल्पना फंड,आरोग्य सेविका सोनाली तुपे प्राचार्य योगेश फाळके, व सर्व महिला शिक्षिका यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या वतीने मान्यवर महिलांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक योगेश तंटक, नागेश लिंगायत, सत्यजित पवार,आदित्य घुगे, परमेश्वर उबाळे, दुर्गेश कामथे,सागर मुगले,शिक्षिका अनिसा शेख, नम्रता थोरात, वैशाली बोर्डे, आसमा पठाण, शोभा नागरे, अर्चना थळपती,सविता राजगुरू, सुनिता बहुरे, पुजा कावडे, सुनिता वायाळ, वर्षा काळवणे , ललिता कुलकर्णी, जयश्री मस्के,सोनम भागुंडे, सुनिता त्रिभुवन, प्रणिता जोशी,सुनिता सुर्यवंशी, ज्ञानेश्वरी देवचे, अश्विनी जाधव, रोहिणी पल्हाळ,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६

## शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाचा एम.जी. एम. विद्यापीठाच्या भारतीय भाषा विभागाशी सामंजस्य करार



**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग, व मराठी भाषा संशोधन केंद्राचा छत्रपती संभाजीनगर येथील एम.जी. एम. विद्यापीठातील भारतीय भाषा विभागाशी सामंजस्य करार (M.O. U. )झाला आहे. (ता. ३) कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचा मराठी विभाग हा उपक्रमशिल विभाग असून या विभागातर्फे सातत्याने विविध उपकमाचे आयोजन करण्यात येते. मराठी विभागाने एम.जी. एम. विद्यापीठाच्या भारतीय भाषा विभागास सामंजस्य करार करण्यासंबंधी प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव स्विकारून त्यास मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके,भारतीय भाषा विभागाचे संचालक प्रोफेसर कृष्णप्रतापसिंह यांनी मान्यता दिली आहे. या सामंजस्य करारातंर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील एम.जी. एम. विद्यापीठाच्या भारतीय भाषा विभागाशी एम. ओ. यू. करणारे हे पहिले महाविद्यालय ठरले आहे. मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी मराठी विभागाचे डॉ. मारोती गायकवाड , डॉ. राम गायकवाड यांची उपस्थिती होती. श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष डॉ. पी.के. निकम, सचिव चंद्रकांतराव देशमुख, कोषाध्यक्ष बाबासाहेब मोहिते, डॉ. भिमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए.के. महाले, गौताळा व्हॅली स्कुलचे अध्यक्ष कृष्णा पा. निकम, संचालक लक्ष्मणराव देशमुख, विशाल आहेर , डॉ. रुपेश मोरे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, आदिंनी अभिनंदन केले आहे.

## औताडेवाडी (भोसे) जि.प. शाळेत विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करत वाढदिवस साजरा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** वाढदिवस म्हटलं तर केक कापून डीजे लावून गाजावाजा करत हा वाढदिवस साजरा केला जातो परंतु असे न करता अत्यंत साध्या पद्धतीने श्री.श्रीकांत जी निकम यांनी दिनांक 01 जानेवारी 2026 रोजी त्यांच्या मुलाचा वाढदिवस असल्यामुळे व नवीन वर्षाच्या निमित्ताने त्यांनी मुलांना खाऊ ,पेढे ,बिस्किट व वह्या- पेन वाटून हा दिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा औताडेवाडी(भोसे)ता मंगळवेढा जि सोलापूर या शाळेत साजरा केला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक श्री. अंकुश मेंगाळ यांनी केले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वस्तू वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते शाळेचे अध्यक्ष मा. श्री.सचिन औताडे ग्रामपंचायत सदस्य श्री वसंत जी निकम श्रीकांत निकम यांची यांची पत्नी व मुलगी तसेच आरोग्य सेविका सौ.शोभाताई औताडे व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ .पुनम मेश्राम मॅडम यांनी केले .कार्यक्रम संपल्यानंतर मुलांना वनभोजनासाठी नेण्यात आले ,त्या ठिकाणी मुलांनी विविध खेळ खेळले त्याचबरोबर तिथे अनेक प्रकारचे फळझाडे ही पाहिली व त्यांचे निरीक्षण ही केले. उदा. काजू, मोसंबी, सफरचंद ,चिकू, आंबा,पेरू, लिंबू ,जांभूळ ,नारळ तसेच मुलांना शाळेचे माजी अध्यक्ष श्री .अमोल कोरे यांनी केळी वाटप केली.

## प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सावित्रीबाई फुले यांचे १९५ जयंती मोठ्या उत्साहात



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे तीन जानेवारी वार शनिवार रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य उल्हास घुरघुरे,प्रमुख पाहुणे ज्येष्ठ प्रा.संजय गिरी सर प्रमुख वक्ते प्रा.उमाकांत महामुनी सर यांची उपस्थिती होती.मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि सावित्रीबाईंच्या कार्यावर आधारित भाषणे आयोजित केली जातात.'बालिका दिन': महाराष्ट्रात मुलींसाठी विशेषतः 'बालिका दिन' म्हणून हा दिवस साजरा होतो.18 व्या शतकात महाराष्ट्रात महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची शनिवारी १९५ वी जयंती साजरी होत आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य 18 व्या शतकात समाजाचा मोठा विरोध पत्कारत स्त्री-शिक्षणासाठी केलेल्या कार्यासाठी ओळखले जाते. सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे 3 जानेवारी 1831 रोजी सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. त्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.यावेळी सावित्रीच्या लेकी प्राध्यापिका यांचा सन्मान करण्यात आला.प्रा.उण्णद रेखा रमेश, प्रा.कु.सरस्वती तपसाळे, प्रा.माधुरी नरगिडे प्रा. कु.साक्षी महामुनी शाळेतील विद्यार्थिनी यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यात आला.प्रिती म्हाळाप्पा बेळे, सोनाली बंडाप्पा धुम्मा, मनिषा मार्तंड कांबळे, लक्ष्मी विष्णू कोठे, ज्ञानेश्वरी संजय सुरवसे, अंजली संजय कांबळे,भाग्यश्री रामचंद्र उडचने, वैष्णवी संजय रुपनुरे, बुशारा शेख, श्रद्धा विठ्ठल मळशेट्टी.मयुरी राठोड,या वेळी प्रमुख वक्ते प्रा.उमाकांत महामुनी सावित्री बाई फुले यांचा जीवन परिचय आढावा त्यांनी विद्यार्थी समोर मांडले...इ.स. 1896 साला तल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्यचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्री करणाऱ्या बाया - बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. इ.स. 1896-97 दरम्यान पुणे व परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेत होता. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्री बाईं नाही प्लेग झाला. त्यातून मार्च 10, इ.स. 1897 रोजी त्यांचे निधन झाले.सावित्रीबाई नी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. अनाथांना आश्रय मिळवा हेही त्याचे कार्यक्षेत्र होते. सामजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यामुळेच १८९६ दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले . पुढे 1897 मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वतः च्या प्रकृती चीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले . दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या.यावेळी प्रा.संजय गिरी,प्रा.नाकाडे सुधीर शेषराव, प्रा.सोलंकर नारायण त्र्यंबक,प्रा. रामपूरे सतिश नामदेव,प्रा.सुर्यवंशी अजित सुर्यकांत,प्रा.बंडगर बिभीषण दत्तात्रय,प्रा.अंबर विश्वजीत चंद्रकात, प्रा.राठोड दयानंद लक्ष्मण, प्रा.धर्माधिकारी राघवेंद्र शामाचार्य, प्रा. गायकवाड अमोल मनोहर,प्रा.वाकडे रत्नदीप राजेंद्र, प्रा.जमादार सलीम गणी, प्रा.राठोड अजित मोतीराम, प्रा.कु.उण्णद रेखा रमेश,प्रा.सरस्वती तपसाळे, प्रा.माधुरी नरगिडे,प्रा. संगशेट्टी महेश, प्रा.कु.महामुनी साक्षी संजय,फिरोज कागदी,राजू कोळी,धनराज कांबळे आदींची उपस्थिती होती.सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु .जाधव सोनाली प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सतिश रामपुरे आणि शेवटी विद्यार्थिनी आभारप्रदर्शन कु.श्रद्धा लुटे यांनी मानले ..

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## ऑनलाईन कामांच्या जाचा विरोधात शिक्षकांचा एल्गार, राज्यव्यापी बहिष्काराचा इशारा

**कन्नड (अरुण थोरात):** राज्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांवर लादण्यात आलेल्या ऑनलाईन कामांच्या अतिरेकामुळे आता शिक्षक संघटना आक्रमक झाल्या असून, या जाचातून मुक्तता न मिळाल्यास राज्यव्यापी बहिष्काराचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना याबाबत सविस्तर निवेदन पाठवून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. "शिक्षकांना शिकवू द्या आणि विद्यार्थ्यांना शिकू द्या" अशी साद घालत, प्रशासकीय कामांसाठी शिक्षकांच्या खाजगी मोबाईलचा आणि वेळेचा होणारा गैरवापर थांबवण्याची मागणी राज्याध्यक्ष विजय कोबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केली असल्याचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे मराठवाडा विभागीय प्रसिध्दीप्रमुख सतीश कोळी यांनी दिली. सध्या शाळांमध्ये शैक्षणिक कार्यपिक्षा पोर्टल, लिंक्स आणि विविध ॲप्सवर माहिती भरण्यालाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. यु-डायस, शालार्थ प्रणालीपासून ते दैनंदिन पोषण आहार आणि आता विद्या समीक्षा केंद्र (VSK) अंतर्गत स्मार्ट उपस्थिती चॅटबॉटवर माहिती भरण्याची सक्ती शिक्षकांसाठी असह्य झाली आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागात इंटरनेटची सोय नसताना आणि शिक्षकांच्या खाजगी मोबाईलची साठवणूक क्षमता संपलेली असतानाही, प्रशासनाकडून ही कामे पूर्ण करण्यासाठी सतत दबाव टाकला जात आहे. यामुळे वर्गातील प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ कमी होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप शिक्षक समितीचे जिल्हा अध्यक्ष विजय साळकर यांनी केला आहे. शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींना बगल देणारा दि. १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय आणि निपुण महाराष्ट्र सारख्या मोहिमा राबवताना खाजगी संस्थांच्या (VOPA) सदोष ॲपचा होणारा वापर, यामुळे शिक्षकांचे मनोधैर्य खचत आहे. खाजगी संस्थांकडून प्रसिद्ध केली जाणारी आकडेवारी ही जिल्हा परिषद शाळांची आणि शिक्षकांची जाणीवपूर्वक बदनामी करणारी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. एकीकडे शिक्षक संख्या कमी होत असताना, दुसरीकडे शिक्षकेतर कर्मचा-यांअभावी सर्व प्रशासकीय भार शिक्षकांवरच टाकल्याने शिक्षकांचे वैयक्तिक आयुष्यही तणावपूर्ण झाले आहे.या गंभीर समस्येवर तोडगा म्हणून शाळा स्तरावरील सर्व ऑनलाईन कामांसाठी समूह साधन केंद्र शाळा स्तरावर स्वतंत्र डेटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करावी, अशी जुनी मागणी शिक्षकांनी पुन्हा लावून धरली आहे. प्रशासनाने यावर तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन शिक्षक संघटनांशी चर्चा करावी, अन्यथा संपूर्ण राज्यात ऑनलाईन कामांवर बहिष्कार टाकून खाजगी मोबाईलचा वापर बंद करण्याची चळवळ उभी केली जाईल, असा सज्जड इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने दिला आहे. यावेळी जिल्हा अध्यक्ष विजय साळकर, जिल्हा सरचिटणीस रंजित राठोड, जिल्हा कोषाध्यक्ष दिलीप रासणे, जिल्हा संपर्कप्रमुख कडुबा साळवे, जिल्हा कार्याध्यक्ष के.डी.मगर, जिल्हा नेते विष्णु भंडारे,राज्य प्रवक्ते नितीन नवले, मराठवाडा अध्यक्ष शामभाऊ राजपुत, राज्य संघटक शालीकराम खिस्ते, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सतिष कोळी,मराठवाडा संघटक पंडित भोसले, मराठवाडा संपर्कप्रमुख रऊफ पठाण, जेष्ठ नेते रमेश पवार, राजु ठाकुर, एल.के.घुगे, कालीदास रणनवरे, नामदेव पवार, सुनील बडे, टि. के. पुनवटकर, नामदेव चव्हाण, बबन थोरे अंकुश चव्हाण, महावीर इंदौरे, जनार्दन मगर, दत्तात्रय थोरात, कैलास ढेपले, महिला आघाडी प्रमुख मंगलाताई मदने (जि. अध्यक्ष), प्रिती जाधव (जि. सरचिटणीस), उर्दू विभाग प्रमुख जावेद अन्सारी, फातेमा बेगम, शहबाज मुव्ही, फजलुल्लाह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### प्रतिक्रिया

आम्ही तंत्रज्ञानाच्या विरोधात नाही. पण तंत्रज्ञानाचा अतिरेक अध्यापनाच्या मुळावर येत असेल तर ते सहन केले जाणार नाही. ग्रामीण भागात रेंज नसतानाही माहितीची सक्ती केली जाते. शासनाने यावर तातडीने तोडगा न काढल्यास संपूर्ण राज्यात ऑनलाईन कामांवर बहिष्कार टाकला जाईल. - अशोक डोळस, तालुका अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती पैठण तालुका

## कालिकादेवी विद्यालयाल,'विज्ञान प्रदर्शनात' शोएब शौकत तालुक्यातून प्रथम



**शिरूर कासार :** 'गटशिक्षणाधिकारी कार्यालय' शिरूर (का.)व कै.सुभद्राबाई माध्यमिक विद्यालय, तागडगाव, ता.शिरूर (का.)यांच्या संयुक्त विद्यमाने "५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन-२०२६" हे विज्ञान प्रदर्शन दिनांक ३१ डिसेंबर २०२५ ते दि.०२ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते.या 'बाल विज्ञान प्रदर्शनात'कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या मार्गदर्शनाखाली, विद्यार्थी व शिक्षक यांनी तीन दिवस असणाऱ्या "५३ व्या विज्ञान प्रदर्शनात" सहभाग नोंदवला होता.इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या माध्यमिक गटातून विद्यालयाचा विद्यार्थी चि.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने,"बहुउद्देशीय सौर रस्ता क्लीनर" म्हणजेच सौर उर्जेवर चालणारे एक आधुनिक उपकरण बनवून विज्ञान प्रदर्शात सादर केले.या बहुउद्देशीय यंत्राचे तसेच नव्या कौशल्याचे वेगळेपण अधोरेखीत झाले आहे.त्याच्या वेगळेपणामुळेच विद्यालयाचा तालुक्यातून 'प्रथम क्रमांक'आला आहे.तसेच विज्ञान प्रदर्शनात 'विज्ञान प्रश्नमंजुषा परीक्षा' घेण्यात आली होती,या परीक्षेत कु.आराध्या गीते,कु.श्रावणी मोरे व कु.समृद्धी तुपे या विद्यार्थिनींने 'विशेष प्राविण्य' मिळविले आहे. यामध्ये विज्ञान शिक्षक प्रा.सुनील मोरे व श्री वसंत आहेर यांच्या कल्पकतेमुळे व योग्य मार्गदर्शनामुळेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्यालयाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.हा पुरस्कार शिक्षणविस्तार अधिकारी मा.शेख जमीर साहेब, गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब,केंद्रप्रमुख मा.संभाजी सोनवणे साहेब व परीक्षक श्री मुळे सर यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कालिकादेवी विद्यालयाला मिळालेल्या या दोन पुरस्कारामुळे,आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री मा.जयदत्त (अण्णा)क्षीरसागर साहेब,मा.रोहित (भैया) क्षीरसागर,प्रशासकीय अधिकारीडॉ.राजु मचाले साहेब,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार सर,मा.एम.ए.राऊत सर,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रवीण शिंदे व सर्व शिक्षक सहकारी तसेच शाळेतील मुलींच्या हस्ते प्रतिमापूजन करून सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणातून आपले विचार व्यक्त केले. मुलगी शिकली तर घराची प्रगती होते , सावित्रीबाईंनी मुलींसाठी शिक्षणाची सुविधा निर्माण करून खूप मोठे कार्य केलेले आहे .त्याचाच फायदा आजही सर्वांना होत आहे, याविषयी शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे व उमेश हुकुमदार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील शिक्षक प्रदीप पवार, मनोज रायसिंगे, पांडुरंग सुपेकर, अतुल दसोडे, चंद्रकांत बामणीया, फुरकान शेख ,लक्ष्मण गझलवाड व अंशकालीन निदेशक धनंजय अहिरे ,प्रवीण राठोड,अंकुश राठोड उपस्थित होते. उमेश हुकुमदार यांनी सूत्रसंचालन केले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## इकरा पब्लिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बालिका दिन व महिला मुक्ती दिन साजरा



**जळगाव :** इकरा पब्लिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी विद्यार्थी आणि शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी मनोगते व्यक्त केली.सावित्रीबाई फुले यांच्यामुळे भारतीय महिला सक्षम झाल्याचे ज्येष्ठ शिक्षिका जिया उन्निसा यांनी सांगितले.या वेळी तरन्नूम खान,आरीफ खान,आदी शिक्षक उपस्थित होते.

## दीप ज्ञानाची

मुलींना शिक्षण देतांना
माय सावित्री धावली
ज्ञानज्योतीची प्रकाश
साऱ्या मुलींना दावली. १

शिक्षण देण्यास मुलींना
माता सावित्री राबली
क्रांतीज्योतीची ज्ञानबीज
समाजात अविरत पेरली. २

मुलींना साक्षर करतांना
माय सावित्री झिजली
ज्योतिबांची शिक्षण ज्योत
सदोदित तेवत ठेवली. ३

ज्योतिबांच्या शाळेत शिकून
आद्य शिक्षिका बनली
शिक्षणाचे महत्त्व जाणून
स्त्रियांना शिक्षण दावली. ४

काव्यफुलेतुन मानवास
माणुसकी शिकविली
रोगराईत मदत करून
संकटातून सोडविली. ५

हाती घेऊन ज्ञानज्योती
दीप ज्ञानाची लावली
मुलींची शाळा काढूनी
प्रस्थापितांशी लढली. ६

नागेश बोंतेवाड, छत्रपती संभाजीनगर

## जीवन सुंदर करणारे संस्कार



**सं**स्कार म्हणजे माणसाच्या विचारांना, वागणुकीला आणि सवयींना योग्य दिशा देणारे नियम. चांगले संस्कार माणसाला शिस्तबद्ध बनवतात, त्याचा स्वभाव सुंदर करतात आणि त्याचे जीवन आनंदी बनवतात. माणूस जन्मतः काहीही शिकलेला नसतो. तो हळूहळू घर, शाळा आणि समाजातून शिकतो. या शिकवणीतून त्याच्यावर संस्कार होत जातात. घर हे संस्कार शिकवण्याचे पहिले ठिकाण आहे. आई-वडील, आजी-आजोबा आणि घरातील मोठी माणसे मुलांवर मोठा प्रभाव टाकतात. मुलांना खरे बोलणे, वेळेवर उठणे, स्वच्छ राहणे, मोठ्यांचा आदर करणे आणि लहानांवर प्रेम करणे ह्या गोष्टी घरातून शिकवल्या जातात. घरातील प्रेमळ आणि शिस्तीतले वातावरण मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवते. जे मुलं नियमीत आणि आदर्श वातावरणात वाढतात, त्यांना जीवनात योग्य मार्ग समजायला मदत होते. शाळा हे संस्कार घडवणारे दुसरे महत्त्वाचे ठिकाण आहे. शिक्षक फक्त अभ्यास शिकवत नाहीत, तर शिस्त, मेहनत, संयम, सहकार्य आणि जबाबदारी देखील शिकवतात. वर्गात नियम पाळणे, गृहपाठ वेळेवर करणे, मित्रांशी समान वागणे, शिक्षकांचा आदर करणे ह्या सवयी मुलांमध्ये लहानपणापासून लागतात. खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धा यांतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. शाळेत मिळालेले संस्कार जीवनभर माणसाला मदत करतात. समाजाचा माणसावर मोठा प्रभाव असतो. आपण ज्या लोकांमध्ये राहतो आणि ज्या गोष्टी पाहतो, त्यांचा आपल्या विचारांवर परिणाम होतो. चांगले लोक आणि आदर्श व्यक्ती आपल्याला योग्य मार्ग दाखवतात. सण-उत्सव आणि परंपरा आपल्याला प्रेम, आदर आणि एकोप्याची शिकवण देतात. समाजातून मिळणारी शिकवण माणसाला फक्त स्वत:साठी नव्हे, तर इतरांसाठी योग्य निर्णय घेण्यास शिकवते. आजच्या आधुनिक काळात मोबाइल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर खूप वाढला आहे. या माध्यमातून माहिती मिळते, पण चुकीचा वापर वाईट सवयी निर्माण करू शकतो. त्यामुळे मुलांना आणि तरुणांना विवेकबुद्धीने वागणे, वेळेचे महत्त्व समजून घेणे आणि योग्य गोष्टी स्वीकारणे शिकवले पाहिजे. आत्मसंयम आणि विवेक यासारखे संस्कार या काळात फार गरजेचे आहेत.चांगले संस्कार माणसाला संकटाच्या वेळी धीर धरण्याची शिकवण देतात. यश मिळाल्यावर नम्र राहणे, अपयश आल्यावर धैर्य राखणे, इतरांसाठी मदत करणे आणि नियम पाळणे ह्या गोष्टी संस्कारामुळे माणसामध्ये येतात. अशा सवयी माणसाला आदर्श बनवतात. समाजात आदर मिळवण्याचे मुख्य कारण म्हणजे माणसाचे चांगले संस्कार असणे. विद्यार्थी जीवनात संस्कार फार महत्वाचे आहेत. लहानपणी लागलेल्या सवयी आयुष्यभर सोबत राहतात. वेळेचे महत्त्व जाणून घेणे, मेहनत करणे, प्रामाणिक राहणे आणि इतरांशी चांगले वागणे ह्या गोष्टी संस्कारातून शिकता येतात. या सवयी विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी करतात. संस्कार फक्त घर आणि शाळेत शिकले जात नाहीत. मित्र, समाज, पुस्तकं, निसर्ग आणि जीवनातील अनुभव यांद्वारेही संस्कार येतात. जे माणूस समजून घेतो, त्यावर विचार करतो आणि आत्मसात करतो, ते संस्कार त्याच्या जीवनाचा भाग बनतात. चांगले संस्कार जीवनाला योग्य दिशा देतात आणि व्यक्तिमत्त्व सुंदर करतात. संस्कारामुळे माणूस नियम पाळतो, इतरांची मदत करतो, जबाबदारी घेतो आणि आदराने वागतो. जीवनात अनेक अडचणी येतात, पण संस्कार असलेला माणूस धैर्याने त्या अडचणींवर मात करतो. चांगले संस्कार जीवन सुंदर करतात, केवळ स्वत:साठीच नाही तर संपूर्ण समाजासाठी फायदेशीर ठरतात. संस्कार हे माणसाचे खरे धन आहेत. ते आयुष्यभर सोबत राहतात आणि माणसाला चांगला बनवतात. जीवन सुंदर करायचे असेल तर चांगले संस्कार जपणे खूप गरजेचे आहे. प्रत्येकाने घर, शाळा आणि समाजातून मिळालेली शिकवण आत्मसात करून स्वत:साठी आणि समाजासाठी आदर्श बनावे. संस्कार नसतील तर जीवन अपूर्ण राहते, परंतु चांगले संस्कार माणसाचे जीवन आनंदी, सुंदर आणि अर्थपूर्ण बनवतात.



**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
परभणी 9096075630


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**


## गावरान तडका: फक्त करमणूक

**म**हाराष्ट्रामध्ये नगरपरिषदा, नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुकी मुळे वातावरण दिवसेंदिवस तापले गेले असल्याचे दिसते. या निवडणुकीसाठी कोणी तरी एबी फॉर्म मिळवण्यासाठी कोणाचे फार्म हाऊसचे दरवाज्ये तोडले, कोणी आपल्या ऐवजी दुसऱ्याला पक्षाने एबी फॉर्म दिला म्हणून त्याचा फॉर्म हिसकावून घेऊन गिळला परंतु प्रकरण अंगाशी आल्यावर फॉर्म गिळला नसून तो फाडला असल्याचा खुलासा प्रसार माध्यमांसमोर केला , तर कोणी रागाने दुसऱ्याला मिळालेलाएबी फॉर्म फाडला. एका घरातील चार सदस्यासाठी काही तरी जुगाड करून चार एबी फॉर्म मिळवले व मात्र त्यानंतर प्रकरण अंगलट आल्यावर माफी मागत त्यापैकी दोन फॉर्म पक्षाकडे परत केले . या निवडणुकात इतर निवडणुकापेक्षा काहीतरी भलतंच घडलं हे मात्र खरं.काही ठिकाणी वडिलांच्या विरोधात मुलगा उभा राहिला, काही ठिकाणी सासूच्या विरोधात सून उभी राहिली ,भावाच्या विरोधात बहीण उभा राहिली ,भावाच्या विरोधात भाऊ उभा राहिला. आईच्या विरोधात मुलगी उभी राहिली. अशा प्रकारची आणखी कितीतरी कॉम्बिनेशनस असतीलही. परंतु मेहुणीच्या विरोधात मेहुणा उभा राहिला असे मात्र मला वाचायला किंवा ऐकायला मिळाले नाही हे मात्र खरे. पुण्यात तर महाभयंकरच घडले. शेवटी आमच्या पुण्याचे काहीतरी वेगळाच! म्हणतात ना पुणे तेथे काय उणे !! पुण्यात कोणाला उमेदवारी नाकारल्याने त्याचे अश्रू अनावर झाले, कोणातरी महिलेचे तर डोळेच पांढरे झाले, तिचा जीव जातो की काय ? या कल्पनेने क्षणभर घरातील लोकांचाच जीव जाण्याची वेळ आली ,काय करावे आणि काय नाही,? हे त्यांना त्या क्षणी सुचत नव्हते, कोणातरी महिलेचे तिकीट नाकारल्यामुळे अतिव दुःखामुळे ती महिला घेरी येऊन पडली तर कोणी अंगावर रा◌ॅकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.. एका ठिकाणी तर भयंकरच प्रकार घडला, पती-पत्नीने एकाच जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. पतीने अर्ज मागे घेतल्याशिवाय सासरी नांदायला येणार नाही अशी शपथ घेऊन व तशी तंबी देऊन पत्नीने थेट माहेर गाठले ., तर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारी अर्ज मागे घेणार नाही, पत्नी परत आली नाही तरी चालेल परंतु आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही अशी ठाम भूमिका घेत पतीने शपथ पूर्वक दृढनिश्चय केला असल्याचे समजले आहे. यात खरे किती खोटे किती माहित नाही. सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, कल्याणासाठी , सेवेसाठीची स्वतःचा संसार उध्वस्त झाला तरी चालेल , प्राण गेला तरी बेहत्तर ही भावना मनात बाळगून उमेदवार तसेच त्याचे मित्र मंडळ व नातेवाईकांची चाललेली ही मनापासूनची समाजसेवेची तळमळ पाहिली की माझ्यासारख्या निर्मळ मनाच्या व भोळ्या ,भाबड्या ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहतात व अंगावर शहारे येतात, मन भरून येते , दिवसेंदिवस लोकशाही अधिक समृद्ध, दृढ व घट्ट होत आहे हे पाहून अक्षरशः अंतकरण हेलावते व क्षणभर डोळ्यात आनंदाचे व अभिमानाने अश्रू येतात .धन्य ते लोक व धन्य ती लोकशाही. यानिमित्ताने शेवटी जनसामान्यांना एकच विनंती करतो की माणसे ओळखायला शिका, नाहीतर तुमची आयुष्यभर फसगत व फरपट झाल्याशिवाय राहणार नाही.या निवडणुकीच्या माध्यमातून नवनवीन फंडे व नवनवीन प्रकार पाहायला व ऐकायला मिळाल्यामुळे सर्वसामान्यांची करावानुक व मनोरंजन मात्र निश्चितच झाले आहे.

**संकलन व संकल्पना :**
**प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख**
**पुणे**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६




**छत्रपती संभाजीनगर:** मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डॉ. हसन इनामदार सोबत कार्यालयीन अधिक्षक नूतन तुषारसिंग राजपूत, अभिनेते डॉ. दिलीप वाघ, रिना राऊत, मुकेश लहरे, आयशा शेख आदी दिसत आहे.

## वडनेरतांडा येथे शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना



**कन्नड प्रतिनिधी :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वडनेरतांडा ता - कन्नड येथे दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी सरपंच मुलचंद पवार यांच्या अध्यक्षतेखाली पालकसभेचे आयोजन करण्यात आले. या सभेमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करण्यात आली.पालक सदस्य म्हणून संतोष राठोड, रंजना राठोड, गोवर्धन चव्हाण, रुखमनबाई पवार, मंजुषा पवार, रविना राठोड, भाग्यश्री राठोड व पंढरीनाथ चव्हाण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झालेल्या सदस्यांमधून संतोष राठोड यांची अध्यक्षपदी तर रंजना राठोड यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.नवनियुक्त अध्यक्ष संतोष राठोड यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, नवीन समितीच्या माध्यमातून शाळेचा भौतिक व शैक्षणिक विकास साधणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, शालेय परिसर सुशोभित करणे, वृक्षलागवड करणे, मध्यान्ह भोजनाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. यासोबतच विद्यार्थ्यांची गळती थांबवणे व नवीन विद्यार्थ्यांना शाळेकडे आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली व नवीन समितीमुळे शाळेच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.या प्रसंगी मुख्याध्यापिका प्रतिभा राणे यांच्यासह शिक्षकवृंद सतीश पवार, विनोद पवार, संतोष अष्टेकर, नरेंद्र देशमुख, मदन करवंदे, राजू चव्हाण, कारभारी आव्हाळे, सौ. तृप्ती जाधव, नवज्योती राठोड व चंद्रकला राठोड यांनी नवनियुक्त समितीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## स्पेशल प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंती, पालक सभा व बालिका दिन साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जि. प.स्पेशल प्राथमिक शाळा भीमनगर मुरुम येथे सावित्रीबाई फुले जयंती दिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष निर्मलकुमार जगन्नाथ लिमये, प्रमुख अतिथी सुमनबाई कांबळे, तर प्रमुखउपस्थिति मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष शिवराज कांबळे, सदस्या नाजिया मडे, श्वेता गायकवाड, गौराबी नदाफ, रेश्मा मुरुमकर, भौरव्वा साखरे, स्नेहल गोडबोले, अश्विनी कांबले, रेश्मा गायकवाड़,आरती कांबले,लक्ष्मी सागर, बंकलगी, आदिती कांबळे, सपना कांबळे, जितेंद्र गायकवाड, जयपाल सुरवसे, विष्णू गायकवाड, सोफियान मुजावर बहुसंख्येने पालक आदि उपस्थित होते. यावेळी शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष निर्मलकुमार जगन्नाथ लिमये यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन पर मार्गदर्शन केले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्याची माहिती विद्यार्थ्यांनी भाषणातून व्यक्त केले. सावित्री तू शिक हे नाटक, आम्ही सावित्रीच्या मुली काव्य नाट्य, फुले सावित्री नसती तर मुलगी शिकली असती काय नृत्य, सावित्री फुले वानी तुम्ही व्हावे धनवान प्रबोधन पर गीत सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली. पालक सभेत शाळेच्या दैनंदिन अभ्यासक्रमासह विविध स्पर्धा व उपक्रम संबंधी विषयावर पालकांनी भरभरून प्रतिसाद दिला. रुपचंद ख्याडे सरांनी ७ ते ८ या वेळेत सर्वांनी टीव्ही व मोबाईल बंद ठेवून विद्यार्थी अभ्यासाला बसवण्याचे आव्हान केले. निर्मलकुमार जगन्नाथ लिमये यांनी त्यास अनुमोदन दिले. पालकांनी हात उंचावून सर्वानुमते ठराव संमत केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवाजी गायकवाड, आशालता शिवकर, राजेश गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंगद थिटे सूत्रसंचालन रुपचंद ख्याडे व आभार प्रमिला तुपेरे यांनी मानले.

## थंडी वाजली वाजली

थंडी वाजली वाजली थंडी सुटली सुटली
गार गार वाऱ्यासंगे कशी कानाला झोंबली!!धृ!!

पौष महिना लागता सडा बर्फाचा पडे
चुलीपाशी शेकण्यास जाई दोन हात पुढे
कपभर चहा घेता ऊब जीवाला वाटली
अशा थंडीच्या दिसात कशी शेकोटी पेटली!!१!!

भल्या पहाटे माऊली टाके सडा अंगणात
रान हिरवे न्हाले दवबिंदूच्या पावसात
कुडकुडले शिवार भेग मातीला पडली
पिक येई भरभर, थंडी भुईला वाजली!!२!!

रानभर जोंधळ्याची डोले हिरवी कणसं
शेकोटीच्या आसपास सारी मायेची माणसं
जुन्या दिवसांची ऊब शेकोटीत साठलेली
मायमातीची आठवण काळजात जपलेली!!३!!



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## ज्ञानेश्वर विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती - निमित्त प्रतिमा पूजन व विविध स्पर्धांचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर : बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विविध स्पर्धांचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात आणि मान्यवर

कार्यक्रमाची सुरुवात कैलासवासी पंढरीनाथ पाटील शिसोदे (उर्फ भाऊ) आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. हा संपूर्ण सोहळा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पदाधिकारी: अध्यक्षा: श्रीम. मंगल पवार प्रमुख पाहुणे: श्री. रामेश्वर कोठुळे, श्रीम. स्वाती महाजन प्रमुख वक्ते: श्री. शहादेव खंडागळे सर

सूत्रसंचालन: श्रीम. शरयू बोरगावकर आभार प्रदर्शन: श्री. राजकुमार देगलूरकर सर प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन

प्रमुख वक्ते श्री. खंडागळे सर यांनी आपल्या जीवनातील शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. शिक्षण घेतल्यामुळे आपण सुखाच्या सावलीत राहू शकतो आणि आपल्याला उदरनिर्वाहाचे साधन मिळेल, असे विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडले.

अध्यक्षीय समारोप कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती मंगल पवार यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुलेंच्या जीवनातील धैर्य, चिकाटी आणि समता या मूल्यांचा बोध दिला व ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले. स्पर्धेचे निकाल (कला आणि वक्तृत्व):

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित केलेल्या स्पर्धांचे निकाल खालीलप्रमाणे आहेत: 1. वक्तृत्व स्पर्धा (5 वी ते 7 वी गट): प्रथम क्रमांक: अवनी मिटकर (5 ब) द्वितीय क्रमांक: पार्थ कुलभैया (6 ब) 2. वक्तृत्व व एकपात्री नाटक (8 वी ते 10 वी गट): विशेष सादरीकरण: पूर्वी कासोटे (9 वी ब) 3. नृत्य व नाटिका स्पर्धा: प्रथम: तन्वी आणि ग्रुप (नृत्य नाटिका - 'तू चाल पुढं') द्वितीय: मेधा पुसे आणि ग्रुप ('ये गं बाई', 'लिहू काशाची अ, आ, इ') तृतीय: ऋतुजा हिंगे आणि ग्रुप (नृत्य नाटिका - 'जीते है चल') परिश्रम सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे आणि प्रेरणेचे वातावरण पाहायला मिळाले.






# जागतिक ब्रेल दिवस आणि समावेशक समाजाचा शोध

दरवर्षी 4 जानेवारी रोजी साजरा होणारा 'जागतिक ब्रेल दिवस' हा केवळ एका लिपीचा गौरव करणारा दिवस नसून, तो मानवी समाजाच्या संवेदनशीलतेची, समतेच्या जाणिवेची आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांची पुनर्तपासणी करण्याचा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ब्रेल लिपी ही दृष्टीहीन व्यक्तींसाठीची वाचन-लेखन पद्धत एवढ्यापुरती मर्यादित राहत नाही, तर ती समाजाने अपंगत्वाकडे पाहण्याची दृष्टी बदलणारी, सामाजिक समावेशनाचा मार्ग प्रशस्त करणारी आणि मानवी सन्मानाचा आग्रह धरणारी एक परिवर्तनशील संकल्पना आहे. ज्या समाजात ज्ञान, शिक्षण आणि माहिती ही दृष्टीवर आधारित मानली गेली, त्या समाजात स्पर्शाच्या माध्यमातून साक्षरतेचा नवा मार्ग निर्माण होणे, हे सामाजिक परिवर्तनाचे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरते.ब्रेल लिपीचे जनक लुई ब्रेल यांचा जन्म 4 जानेवारी 1809 रोजी फ्रान्समध्ये झाला. लहानपणी अपघातामुळे दृष्टी गमावलेल्या लुई ब्रेल यांचे आयुष्य त्या काळातील दृष्टीहीन व्यक्तींच्या सामाजिक स्थितीचे जिवंत चित्र होते. त्या काळात दृष्टीहीनता ही केवळ शारीरिक मर्यादा मानली जात नव्हती, तर ती सामाजिक अपयश समजली जात होती. अशा व्यक्तींना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागापासून दूर ठेवले जात असे. या पार्श्वभूमीवर सहा ठिपक्यांवर आधारित लिपीचा शोध लावणे, ही केवळ बौद्धिक किमया नव्हती, तर ती समाजाने घालून दिलेल्या मर्यादांविरुद्ध उभी राहिलेली मानवी जिद्द होती. ब्रेल लिपीने हे स्पष्ट केले की दृष्टी नसली तरी विचार, कल्पना आणि सर्जनशीलता अबाधित राहू शकते.समाजशास्त्र सांगते की अपंगत्व ही संकल्पना जैविकपेक्षा अधिक सामाजिक आहे. एखादी व्यक्ती दृष्टीहीन असणे ही समस्या नसून, त्या व्यक्तीसाठी समाजाने अनुकूल व्यवस्था न उभारणे ही खरी समस्या आहे. ब्रेल लिपीने या सामाजिक अडथळ्याला थेट आव्हान दिले. तिने दृष्टीहीन व्यक्तींना ज्ञानाच्या प्रवाहात स्वतंत्रपणे सहभागी होण्याचा अधिकार दिला. त्यामुळे ब्रेल ही केवळ लिपी न राहता सक्षमीकरणाचे, स्वावलंबनाचे आणि आत्मसन्मानाचे प्रतीक बनली. समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळवण्यासाठी दृष्टी असणे ही अट नसून, संधी उपलब्ध असणे हीच खरी गरज आहे, हा संदेश ब्रेल लिपीने दिला.भारतीय समाजाच्या संदर्भात ब्रेल लिपीचे महत्त्व अधिक खोलवर समजून घ्यावे लागते. भारतात अपंगत्व हे अनेकदा दारिद्र्य, अशिक्षण, जातीय विषमता आणि ग्रामीण वास्तव यांच्याशी जोडलेले असते. दृष्टीहीन व्यक्तींना शारीरिक मर्यादेपेक्षा सामाजिक दुर्लक्षाचा अधिक सामना करावा लागतो. शहरी भागात काही प्रमाणात ब्रेल शिक्षणाची साधने उपलब्ध असली तरी ग्रामीण आणि दुर्गम भागांत आजही त्यांचा अभाव दिसून येतो. ही परिस्थिती सामाजिक विकासातील असमतोल आणि धोरणात्मक उदासीनतेचे वास्तव उघड करते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही केवळ शैक्षणिक समस्या नसून, ती सामाजिक न्यायाशी संबंधित गंभीर बाब आहे.शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मूलभूत साधन मानले जाते. दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपी ही शिक्षणाची पायाभूत गरज आहे. केवळ श्रवणाधारित शिक्षणामुळे माहिती मिळू शकते, मात्र साक्षरतेची प्रक्रिया अपूर्ण राहते. अक्षरांची ओळख, शब्दरचना, व्याकरण, लेखनशैली आणि स्वतंत्र विचार यांचा विकास ब्रेल वाचनातून होतो. समाजशास्त्रीय दृष्टीने साक्षरता म्हणजे केवळ वाचता-लिहिता येणे नव्हे, तर ती व्यक्तीला सामाजिकदृष्ट्या सक्षम, विचारशील आणि आत्मनिर्भर बनवणारी प्रक्रिया आहे. ब्रेल लिपीमुळे दृष्टीहीन व्यक्ती केवळ शिकत नाहीत, तर समाजाशी संवाद साधू लागतात.आजच्या डिजिटल युगात काही वेळा ब्रेल लिपी कालबाह्य ठरत असल्याचा गैरसमज निर्माण होतो. स्क्रीन रीडर, ऑडिओ पुस्तके आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी ब्रेलचे महत्त्व कमी झालेले नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन असते, तर ब्रेल ही साक्षरतेची ओळख असते. तंत्रज्ञान बदलते, अद्ययावत होते; परंतु ब्रेल लिपी ही दृष्टीहीन व्यक्तींच्या शिक्षणाची आणि सांस्कृतिक ओळखीची स्थायी पायाभरणी आहे. त्यामुळे तंत्रज्ञान आणि ब्रेल यांचा समन्वय साधणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे.रोजगार आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने ब्रेल लिपीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. शिक्षणाशिवाय रोजगाराच्या संधी मर्यादित राहतात आणि ब्रेलशिवाय दृष्टीहीन व्यक्तींचे शिक्षण अपूर्ण ठरते. अनेक दृष्टीहीन व्यक्तींनी ब्रेलच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेऊन शिक्षक, लेखक, प्रशासकीय अधिकारी, समाजसेवक आणि संशोधक म्हणून समाजात आपले स्थान निर्माण केले आहे. तरीही समाजात आजही दृष्टीहीन व्यक्तींविषयी दयाभाव किंवा सहानुभूतीप्रधान दृष्टिकोन दिसून येतो. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की दया ही समानतेचा पर्याय नाही; समान हक्क, समान संधी आणि सन्मान हाच खरा सामाजिक न्याय आहे.सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रात ब्रेल लिपीची भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. ब्रेल पुस्तकांमुळे दृष्टीहीन व्यक्ती साहित्य, कविता, इतिहास, तत्त्वज्ञान आणि धार्मिक ग्रंथांचा आस्वाद घेऊ शकतात. साहित्य वाचनामुळे व्यक्तीचे भावविश्व समृद्ध होते आणि ती समाजाशी अधिक घट्टपणे जोडली जाते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सांस्कृतिक सहभाग हा सामाजिक समावेशनाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ब्रेल लिपीमुळे दृष्टीहीन व्यक्ती सांस्कृतिकदृष्ट्या परिघावर न राहता समाजाच्या केंद्रस्थानी येतात.जागतिक ब्रेल दिवस साजरा करताना शासन, शैक्षणिक संस्था आणि समाज यांची भूमिका नव्याने तपासण्याची गरज आहे. ब्रेल पुस्तके, मुद्रणालये, प्रशिक्षित शिक्षक, ग्रंथालये आणि आधुनिक ब्रेल साधनांची उपलब्धता आजही अपुरी आहे. ही कमतरता केवळ आर्थिक मर्यादांची नसून, ती सामाजिक प्राधान्यक्रमांच्या अभावाची आहे. एखादा समाज किती प्रगत आहे, हे तो समाज आपल्या वंचित घटकांसाठी किती समावेशक व्यवस्था उभी करतो, यावर ठरते.जागतिक ब्रेल दिवस हा दृष्टीहीन व्यक्तींसाठी सन्मानाचा दिवस असला, तरी तो दृष्टिसंपन्न समाजासाठी आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण खरोखरच समावेशक आहोत का, की केवळ घोषणांपुरतेच समावेशन स्वीकारतो, हा प्रश्न या दिवशी विचारला गेला पाहिजे. ब्रेल लिपी आपल्याला हे शिकवते की मानवी क्षमता या इंद्रियांवर अवलंबून नसतात, तर समाजाने निर्माण केलेल्या संधींवर अवलंबून असतात. योग्य संधी दिल्यास कोणतीही मर्यादा दुर्बलता ठरत नाही.अखेरीस, जागतिक ब्रेल दिवसाचा खरा अर्थ औपचारिक कार्यक्रमांत नसून, प्रत्यक्ष कृतीत आहे. ब्रेल शिक्षणाचा प्रसार करणे, दृष्टीहीन व्यक्तींच्या हक्कांविषयी समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि त्यांना सन्मानाने मुख्य प्रवाहात सामावून घेणे, हीच या दिवसाची खरी पूर्तता ठरेल. स्पर्शातून साक्षरतेकडे आणि साक्षरतेतून समतेकडे नेणारा ब्रेलचा प्रवास हा मानवतेला अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि संवेदनशील बनवणारा आहे. त्या प्रवासात सहभागी होणे ही केवळ दृष्टीहीनांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.




डॉ. राजेंद्र बगाटे

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),

bagate.rajendra५@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ४ जानेवारी २०२६


## अज्ञानाचा अंधार दूर करणारी ज्ञानज्योती म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले : बसवराज कोरे




**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे अवचित्य साधून आजच महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचेही उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रो. बसवराज कोरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. बसवराज कोरे म्हणाले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले या दाम्पत्याने १९व्या शतकामध्ये भारतात एक नवीन क्रांती केली, भारतीय समाज व्यवस्थेने ज्या स्त्री वर्गाला, दिन दलितांना नाकारले होते त्यांना शिक्षण देऊन प्रवाहात आणण्याचे काम या दांपत्याने केले त्याचा परिणाम त्यांना आयुष्यभर भोगावा लागला पण त्याची पर्वा त्यांनी केली नाही. पुढे बोलताना ते म्हणाले अज्ञानाचा अंधार दूर करणारी ज्ञानज्योती म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिवराव मुळे हे होते त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षाचा मुलानी विचार करावा आणि आपले पाऊल टाकावे, शिक्षणाने जीवनाचा उद्धार होतो असे उद्गगार त्यांनी काढले. कार्यक्रमात वाडमय मंडळ स्थापित कार्यकारणी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी केलेतर कार्यक्रमाचे प्रास्तावित डॉ. अश्विनी कुमार चिंचोलीकर यांनी केले व आभार डॉ. नरेश डहाळे यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अर्जुन चव्हाण,डॉ. सुखदेव पोटदुखे,डॉ. किशोर काळे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. हरिदास होळकर, प्रा. लक्ष्मण खरात, डॉ रमेश कचरे डॉ. लावंड, प्रा. माठे, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## निसर्गातली शाळा

मामाच्या शेताची
वाकडी तिकडी वाट
हिरव्या हिरव्या झाडीवर
पक्ष्यांचा किलबिलाट

खळखळ वाहत होतं
पाटाचं गार पाणी
आमराईतली कोकिळा
गात होती गाणी

हिरवळीवर विसावला
बगळ्यांचा शुभ्र थवा
भुकेले सारे वानर
शोधीत होते रानमेवा

रानफुलांचा पसरलाय
रानावनात गंधीत वारा
वृक्षवेली, फळाफुलांनी
नटली ही वसुंधरा

चिखलात मस्ती करायचे
गाई, गुरं,ढोरं
म्हशीवर बसूनी खिदळती
गुराख्याची अल्लड पोरं

जिकडे पहावं तिकडं
उंच उंच माळ
उंच उंच माळाला
जणू भिडले आभाळ

प्रत्यक्ष पाहीलं आज
निसर्गाचे सुंदर रूप
निसर्गातल्या शाळेत असतं
शिकण्यासारखं खूप

**- रविंद व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क 9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी /१२ वी पास

SANITARY HEALTH INSPECATOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी /१२ वी पास

PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.

C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास

E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास

PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास

रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास

O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903